# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## मा.महिला व बालकल्याण समिति
## कार्यपत्रिका क्रमांक १
## <u>सभावृत्तांत</u>

दिनांक ०७/०६/२०१३ वेळ सकाळी ११.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक ०७/०६/२०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.गणेश पाटील, अपर जिल्हाधिकारी ,पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
२) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
३) मा.लोंढे शुभांगी संतोष
४) मा.पालांडे सुजाता सुनिल
५) मा.नेटके सुमन राजेंद्र
६) मा.गोफणे अनुराधा देविदास
७) मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

या शिवाय मा.गावडे – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( मा.महिला व बालकल्याणच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाव्दारे नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली होती.)

मा.अपर जिल्हाधिकारी (पिठासीन अधिकारी) – सर्वाचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेतचा विषय आहे. त्यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केली आहे.

मा.नगरसचिव- विषय क्रमांक १ – मा.महिला व बालकल्याणच्या सभापतीची नेमणूक करणे. मा.महिला व बालकल्याणचे सभापती पदासाठी एक नामनिर्देशन पत्र दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | लोंढे शुभांगी संतोष | नेटके सुमन राजेंद्र | गोफणे अनुराधा देविदास |

(मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासिन अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केले. मा.पिठासीन अधिकारी यांनी त्यांची छाननी केली.)

मा.अपर जिल्हाधिकारी – (पिठासीन अधिकारी) मा.महिला व बाल कल्याण समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. सभापती महिला व बाल कल्याण समिती पदा करिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नांव पुढील प्रमाणे आहे.

१) लोंढे शुभांगी संतोष

कोणत्याही उमेदवारास १५ मिनीटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकारी यांजकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल अशी तरतूद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनीटांचा अवधी देणेत येत आहे.

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला स.११.३५ ते स.११.५० हा १५ मिनीटांचा अवधी संपला)

मा.अपर जिल्हाधिकारी – (पिठासीन अधिकारी) उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा.महिला व बाल कल्याण सभापती पदाची निवडणूक लढविणारे लोंढे शुभांगी संतोष ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक- १
दिनांक- ०७/०६/२०१३ विभाग- नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समिती सभापती पदासाठी एक नामनिदेशनपत्र मुदतीत दाखल झालेले असून वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.महिला व बाल कल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा. लोंढे शुभांगी संतोष हया एकच रितसर नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. लोंढे शुभांगी संतोष यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याणचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
(गणेश पाटील)
अपर जिल्हाधिकारी,पुणे
पिठासीन अधिकारी
महिला व बाल कल्याण (विशेष सभा)

-------------

(नवनिर्वाचित सभापती मा.लोंढे शुभांगी संतोष यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

मा.नगरसचिव - विषय क्रमांक २ - मा.महिला व बाल कल्याण समिती उपसभापतींची नेमणूक करणे. मा.महिला व बाल कल्याण मा.महिला व बाल कल्याण समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक – २ विषय क्रमांक- २
दिनांक- ०७/०६/२०१३
सूचक - मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक - मा.अनिता तापकीर

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या मा.महिला व बाल कल्याणच्या उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.महिला व बाल कल्याण समितीच्या उपसभापतीची नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक – ३ विषय क्रमांक- ३

दिनांक- ०७/०६/२०१३

सूचक - मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक - मा.सुजाता पालांडे

मा.महिला व बाल कल्याण समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चवथ्या बुधवारी दुपारी २.०० वाजता विशेष समिती सभागृहात भ्रविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी/सुट्टयानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(लोंढे शुभांगी संतोष)
सभापती
मा.महिला व बाल कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ५२४ /२०१३
दिनांक - ०७/०६/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.